In Collabroration with Maanavata Hitay Social Foundation & Kamal Foundation
Under Registration Society Act, 12A, 80G, CSR1, Niti Aayog & DSC
मानवता कमल सेवा छत्र
वृद्धाश्रम
समाधानी आयुष्य जगण्याचे एकमेव ठिकाण
Dhanraj Singh Choudhary
7066883322
Under the Guidance of Kawade NGO Consultancy

कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष – २ रे. ✻ अंक १०८ वा. ✻ शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 108 ✻ Saturday 07 November 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

कराड-मलकापूर विकासासाठी ५ कोटींचा निधी : आ.डॉ.अतुलबाबा भोसले

कराड : कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कराड आणि मलकापूर शहराच्या विकासासाठी भाजपा-महायुती सरकारने तब्बल ५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून कराडमध्ये २.१० कोटींची आणि मलकापूर शहरात २.९० कोटींची विविध पायाभूत स्वरुपाची विकासकामे केली जाणार आहेत. यामुळे या शहरांच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

कराड व मलकापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले सातत्याने विशेष प्रयत्नशील राहिले आहेत. भाजपा – महायुती सरकारच्या माध्यमातून त्यांनी शहराच्या प्रगतीसाठी अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी यापूर्वीदेखील भरघोस निधी उपलब्ध करुन दिला आहे. यात आता आणखी ५ कोटींच्या निधीची भर पडली आहे. आ. डॉ. भोसले यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे 'नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान' या योजनेअंतर्गत नगर विकास विभागाच्यावतीने कराडसाठी २.१० कोटींचा; तर मलकापूरसाठी २.९० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



या निधीच्या माध्यमातून कराडमधील सोमवार पेठ (सिटी सर्व्हे क्रमांक ७०) येथील नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेत सभागृह बांधण्यासाठी ६० लाख रुपये, भोई समाज सभागृहाच्या नूतनीकरणासाठी २० लाख, छत्रपती संभाजी महाराज भाजी मंडईच्या नूतनीकरणासाठी १० लाख, बुधवार पेठ येथील आरक्षण क्रमांक ३४ मधील खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी ७० लाख आणि यशवंतराव चव्हाण सभागृहातील वाचनालयामध्ये अभ्यासिका विकसित करण्यासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच मलकापूरमधील लाहोटीनगर येथे स्मार्ट अंगणवाडी इमारत बांधण्यासाठी २० लाख, २४ बाय ७ नळपाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठाविषयक कामांसाठी ५० लाख, प्रभाग क्रमांक ६ मधील सर्व्हे क्रमांक २०८ पैकी खुल्या जागेत उद्यान विकसित करण्यासाठी ९० लाख, आगाशिवनगर येथील स्मशानभूमी विकसित करण्यासाठी ४० लाख, तर त्याच परिसरातील ख्रिश्चन समाजाच्या दफनभूमीच्या विकासासाठी ४५ लाख, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर शेतकरी भाजी मंडईच्या नूतनीकरणासाठी २५ लाख आणि मलकापूर नगरपरिषद हद्दीतील १५ ठिकाणी स्ट्रीटलाईट बसविण्यासाठी २० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या अंतर्गत मंजूर विकासकामांचा १०० टक्के खर्च राज्य शासनाकडून करण्यात येणार आहे.

त्यामुळे या विकासनिधीच्या मंजुरीमुळे कराड व मलकापूर शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. कराड व मलकापूर शहरासाठी ५ कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल शहवासीयांकडून मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार आणि आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्यासह भाजपा-महायुती सरकारचे आभार मानले जात आहेत.

सरसेनापती हंबीरराव मोहितेंचा पुतळा बेळगावच्या लष्करी मुख्यालयात अश्वारूढ पुतळ्याचे १०८ व्या शरकत दिनाचे औचित्य साधून अनावरण

विक्रमसिंह मोहिते यांच्याकडून रेजिमेंटला ऐतिहासिक भेट

करड/प्रतिनिधी : स्वराज्याच्या इतिहासात आपल्या अतुलनीय शौर्याने आणि पराक्रमाने अढळ स्थान निर्माण करणारे कराड तालुक्यातील तळबीडचे सुपुत्र आणि स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा भव्य अश्वारूढ पुतळा बेळगाव येथील ऐतिहासिक मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटरच्या मुख्यालयात दिमाखात विराजमान झाला आहे. रेजिमेंटच्या १०८ व्या 'शरकत दिना'चे औचित्य साधून या पूर्णाकृती पुतळ्याचे लष्करी थाटात अनावरण करण्यात आले. त्यामुळे स्वराज्याच्या इतिहासातील पराक्रमाची परंपरा आणि भारतीय लष्कराच्या शौर्याची गौरवशाली परंपरा यांचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळाला.

मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटरचे कमांडंट ब्रिगेडियर गिरीश उपाध्ये यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी लष्करातील वरिष्ठ अधिकारी, जवान, तसेच सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते, जयाजी मोहिते, सतीश पाटील, प्रताप पाटील, पांडुरंग वेदपाठक, दीपक राजमाने आदी मान्यवर उपस्थित होते. सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते यांनी हा



भव्य अश्वारूढ पुतळा मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटरला भेट म्हणून प्रदान केला आहे. आपल्या पूर्वजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी गाजवलेला पराक्रम आणि त्यांची शौर्यगाथा देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी प्रेरणादायी ठरावी, या भावनेतून मोहिते परिवाराने हा उपक्रम राबविला. त्यामुळे हा पुतळा केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे स्मारक न राहता शौर्य, निष्ठा आणि राष्ट्ररक्षणाच्या कर्तव्याची प्रेरणा देणारे प्रतीक ठरणार आहे.शरकतच्या रणभूमीतील मराठा जवानांच्या बलिदानाचे स्मरणमराठा लाईट इन्फन्ट्रीच्या इतिहासात 'शरकत दिना'ला विशेष महत्त्व आहे. १९१८ मध्ये मेसोपोटेमिया मोहिमेदरम्यान मराठा सैनिकांनी शरकतच्या रणभूमीवर असाधारण शौर्य गाजवले होते. या मोहिमेत ११४ मराठा सैनिकांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या अतुलनीय पराक्रमाच्या स्मरणार्थ रेजिमेंटला 'शरकत' हा युद्धसन्मान प्राप्त झाला. धैर्य, त्याग, शिस्त आणि लष्करी उत्कृष्टतेचे प्रतीक असलेल्या या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण दरवर्षी अभिमानाने केले जाते.

या दिनानिमित्त शरकत युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून हुतात्मा जवानांना आदरांजली वाहिली जाते. यंदाच्या १०८ व्या शरकत दिनाच्या कार्यक्रमाला सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाची ऐतिहासिक जोड मिळाली. स्वराज्यासाठी तलवार गाजविणाऱ्या सरसेनापतींचा पराक्रम आणि देशाच्या रक्षणासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या मराठा जवानांचा त्याग यांचा गौरव करणारा हा सोहळा ठरला. तळबीडच्या मातीत जन्मलेल्या या महान सेनानीचा पुतळा आता बेळगावच्या लष्करी मुख्यालयात उभा राहिल्याने कराड तालुक्याच्या ऐतिहासिक अभिमानातही मानाचा तुरा रोवला गेला आहे.

माजी सैनिकांसाठी राज्यभर विशेष जनता दरबार



करड/प्रतिनिधी : माजी सैनिक, समवेत ३ जून २०२६ रोजी मुख्यमंत्री व माजी सैनिक कल्याणमंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिले होते. त्यानंतर ६ ऑगस्ट रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री शंभूराज देसाई आणि आमदार मनोज घोरपडे यांचे सैनिक फेडरेशनने आभार मानले आहेत. शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी सातारा जिल्हा सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष तथा राज्य उपाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केली आहे.

बांधकाम विभागाने दर्जेदार कामांना प्राधान्य द्यावे : मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

सातारा : जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत सुरू असलेली विकासकामे दर्जेदार आणि निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कामांच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊन लोकाभिमुख कारभार करावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.

सातारा जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात बांधकाम विभागाच्या कामकाजाचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. या वेळी मंत्री भोसले बोलत होते. जिल्ह्यात सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित सुविधांचा विकास अधिक



विकासकामांची सद्यस्थिती, प्रगती, गुणवत्ता आणि प्रलंबित कामांचा त्यांनी आढावा घेतला. कामांमधील अडचणी दूर करून सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील पायाभूत गतिमान करताना कामांच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करू नये. विकासकामे केवळ पूर्ण करण्यापुरती मर्यादित न ठेवता ती गुणवत्तापूर्ण आणि नागरिकांच्या उपयोगाची असावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. प्रिया शिंदे, उपाध्यक्ष राजू भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, बांधकाम विभागाचे सचिव राजभोज, अभियंते हांडे व पवार, जिल्हा परिषद सदस्य ऋतुजा शिंदे, लता कर्णे, अजित साळुंखे, पूजा मोरे, सर्जेराव सावंत, नीता खरात, कामेश कांबळे, अमित चव्हाण, लालासाहेब जगदाळे, रणजित पाटील, मदनभाऊ काळभोर, हनुमंत जगदाळे, शैलजा शिंदे आणि प्रियंका साळुंखे उपस्थित होते. तसेच सातारा पंचायत समितीचे सभापती महेश गाडे, सदस्य राहुल शिंदे आणि जावळी पंचायत समितीचे सभापती सौरभ शिंदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

विमाधारकाच्या निधनानंतर वारसाला २.१० लाखांचा धनादेश

कराड डाक विभागाकडून टपाल जीवन विम्याचा लाभ;अधीक्षिका स्वाती दळवी यांच्या हस्ते रक्कम सुपूर्द

करड/प्रतिनिधी : – टपाल जीवन विमा योजनेच्या माध्यमातून विमाधारकाच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळाला आहे. शिरवडे (यशवंतनगर), ता. कराड येथील संताजी राजाराम डुबल यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसास दोन लाख दहा हजार चारशे रुपयांचा विमा दावा धनादेश कराड डाक विभागाच्या अधीक्षिका स्वाती दळवी यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.



संताजी दुबल यांनी ८ सप्टेंबर २०२५ रोजी डाक कर्मचारी ऋषिकेश बुरुड यांच्या माध्यमातून दोन लाख रुपयांची टपाल जीवन विमा पॉलिसी घेतली होती. या पॉलिसीसाठी त्यांचा मासिक हप्ता दोन हजार ७० रुपये होता. त्यांनी डिसेंबर २०२५ पर्यंत चार महिन्यांचे विमा हप्ते भरले होते. त्यानंतर २४ डिसेंबर २०२६ रोजी कराड येथे त्यांचे निधन झाले.

विमाधारकाच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी विमा दाव्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. त्यानंतर चौकशी अधिकारी अमित देशमुख यांनी तातडीने चौकशी करून अहवाल सादर केला. दाव्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भारतीय डाक विभागामार्फत दोन लाख दहा हजार चारशे रुपयांचा धनादेश वारसास प्रदान करण्यात आला.

यावेळी उपविभागीय डाक निरीक्षक अमित देशमुख, किशोर तुपे, सुधांशू सिंह, ऋषिकेश बुरुड, करण पवार, गायत्री डुबल, रोहिणी डुबल, ओमकार डुबल आदी उपस्थित होते. टपाल जीवन विमा योजना ही नागरिकांना आर्थिक सुरक्षा देणारी महत्त्वपूर्ण योजना असून, अधिकाधिक पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षिका स्वाती दळवी यांनी केले.

अधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच गावात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी-पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : अधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच गावात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि त्यांना सर्वतोपरी मदत करण्याबरोबरच तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या. तसेच पाटण मतदारसंघातील सर्व विकासकामे तातडीने आणि ठरविक वेळेत पूर्ण करावीत, या सर्व कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध असून तो वेळेत खर्च करावा, असे निर्देश ही श्री देसाई यांनी दिले.



दुष्काळ निवारणाच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या शासकीय निधीची अजिबात कमतरता पडू दिली जाणार नाही. यासोबतच दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीण व शहरी भागांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्याला प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचनाही पालकमंत्री श्री. देसाई यांनी केल्या.

मरळी येथील विश्रामगृहात पालकमंत्री श्री. देसाई यांनी पाटण मतदार संघातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. आढावा बैठकीला विविध विभागांचे अधिकारी विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. पाटण मतदारसंघातील पर्यटनविषयक कामांना विशेष गती देऊन पर्यटनाला चालना देण्याच्या सूचना केल्या. तसेच सातारा जिल्ह्यातील सर्व अकरा तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश झाला असल्याने, अधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच गावात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि त्यांना सर्वतोपरी मदत करण्याबरोबरच तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना ही त्यांनी केल्या.



संपादकीय

गोरख तावरे

सत्तेसाठी कायदे बदलणार?

कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ दूध संघाची निवडणूक नुकतीच पार पडली. सभासदांनी मतदानाच्या माध्यमातून आपला कौल दिला. लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पार पडली; मात्र अपेक्षित बहुमत न मिळाल्याने आता सत्ताधारी पक्षाकडून सत्तास्थापनेसाठी वेगळे मार्ग शोधले जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. हा प्रकार केवळ गोकुळ दूध संघापुरता मर्यादित नसून लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांशी संबंधित आहे.सहकारी संस्थांच्या निवडणुका म्हणजे सभासदांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार देणारी प्रक्रिया. या प्रक्रियेत मतदारांनी कोणाला पसंती दिली, कोणाला नाकारले आणि कोणाला किती पाठिंबा दिला, हे महत्त्वाचे असते. निवडणुकीचा निकाल आपल्या बाजूने लागला नाही म्हणून त्यातून पळवाटा शोधणे किंवा सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी नियमांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न करणे, यामुळे लोकशाही प्रक्रियेवरील विश्वासाला तडा जाऊ शकतो.लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते; परंतु बहुमत मिळवण्यासाठी लोकशाहीच्या नियमांनाच बाजूला ठेवता येत नाही. मतदारांनी दिलेला कौल स्वीकारणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची आणि सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. सत्ता मिळाली नाही म्हणून कायद्याचा आधार घेऊन अल्पमतातील व्यक्तींना सत्तास्थानी बसवण्याचा प्रयत्न होत असेल, तर अशा निर्णयांची कायदेशीर वैधता, पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या कसोटीवर तपासणी झाली पाहिजे. कायद्यात बदल करण्याचा अधिकार शासनाला निश्चितच आहे; मात्र तो बदल विशिष्ट निवडणुकीचा निकाल आपल्या सोयीने बदलण्यासाठी किंवा सत्तेचा मार्ग मोकळा करण्यासाठी वापरला जात असल्याचा आभासही निर्माण होता कामा नये. नियम सर्वांसाठी समान असावेत. आज एका संस्थेसाठी वापरलेली पद्धत उद्या अन्य सहकारी संस्थांमध्येही वापरली जाऊ शकते, याचे भान ठेवणे आवश्यक आहे.गोकुळ दूध संघ हा हजारो दूध उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताशी जोडलेला आहे. त्यामुळे या संस्थेतील सत्तासंघर्षात सभासदांच्या हिताला दुय्यम स्थान मिळू नये. निवडणुकीतील विजय-पराजयापेक्षा सहकार चळवळीची विश्वासार्हता आणि सभासदांचा अधिकार अधिक महत्त्वाचा आहे.शेवटी, लोकशाही केवळ मतदान घेण्यापुरती मर्यादित नसते. मतदानानंतर आलेला निकाल स्वीकारणे, विरोधी मताचा आदर करणे आणि नियमांचे पालन करणे यातच लोकशाहीचे खरे सामर्थ्य आहे. सत्ता ही जनतेने किंवा सभासदांनी दिलेली जबाबदारी असते, ती कोणाचाही कायमस्वरूपी अधिकार नसतो. त्यामुळे गोकुळच्या निवडणुकीत सभासदांनी दिलेल्या कौलाचा आदर राखूनच पुढील निर्णय व्हावेत. अन्यथा लोकशाही निवडणुका होतील; पण लोकशाहीचा आत्माच हरवण्याचा धोका निर्माण होईल.

अलक्ष्मी नि:सारण

माता लक्ष्मी ही धनप्राप्तीची देवता आहे. लक्ष्मीची प्राप्ती होण्यासाठी विविध प्रकारचे उपाय केले जातात. ज्याप्रमाणे लक्ष्मीची प्राप्ती व्हावी यासाठी उपाय केले जातात त्याचप्रमाणे अलक्ष्मीचा नाश करण्यासाठी उपाय करणे महत्त्वाचे आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नवीन केरसुणी घेतली जाते. तिला लक्ष्मी असे म्हणतात. लक्ष्मीपूजनाच्या मध्यरात्री या पूजनासाठी नवीन घेतलेल्या केरसुणीने घरातील केर काढावा आणि तो सुपामध्ये भरून बाहेर टाकावा असे शास्त्र आहे. यालाच लक्ष्मी नि:सारण करणे असे म्हणतात. एरवी रात्री केर काढणे आणि तो बाहेर टाकणे हे वर्ज असते. फक्त लक्ष्मीपूजनाच्या मध्यरात्री ही कृती केली जाते. यामुळे घरातील धनाची कमतरता नष्ट होऊन लक्ष्मीचा वास सदैव आपल्या घरामध्ये राहतो.

- **भीमराव साळुंखे,** सातारा.

दिवाळी बोनसचा हक्क आणि बाबासाहेबांची श्रमिकदृष्टी!

दिवाळी आली की घराघरांत आनंदाचे दिवे उजळतात. बाजारपेठांमध्ये खरेदीची लगबग सुरू होते आणि नोकरदारांना बोनसची प्रतीक्षा असते. अनेक कुटुंबांसाठी बोनस म्हणजे मुलांचा आनंद, आवश्यक वस्तूंची खरेदी आणि वर्षभराच्या कष्टांनंतर मिळणारी आर्थिक उसंत. मात्र, बोनसकडे केवळ सणासुदीचा लाभ म्हणून पाहणे म्हणजे त्यामागील कामगार चळवळीचा इतिहास आणि संघर्ष विसरण्यासारखे आहे. बोनस हा मालकाचा उपकार नसून कायद्याने मान्यता दिलेला कामगारांचा हक्क आहे.

भारतात बोनसची संकल्पना एका दिवसात निर्माण झालेली नाही. १९१७ मध्ये पहिल्या महायुद्धाच्या काळात काही कापड गिरण्यांनी कामगारांना युद्धकालीन बोनस दिल्याची नोंद आहे. पुढे कामगारांनी उद्योगाच्या नफ्यात आपल्या श्रमांचाही वाटा असल्याची भूमिका मांडत बोनसची मागणी लावून धरली. या संघर्षातून २५ सप्टेंबर १९६५ रोजी 'वेतन बोनस अधिनियम, १९६५' अस्तित्वात आला.

या संदर्भात एक ऐतिहासिक बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे. बोनसचा



कायदा थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला, असे म्हणणे अचूक ठरणार नाही. मात्र, कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी उभारलेला वैचारिक आणि धोरणात्मक पाया अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे बोनसच्या निमित्ताने त्यांचे स्मरण करणे म्हणजे श्रमिकांच्या सन्मानासाठी त्यांनी केलेल्या कार्याला अभिवादन करणे होय.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कामगारांविषयीची भूमिका न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित होती. २० जुलै १९४२ रोजी त्यांनी व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेत कामगार सदस्य म्हणून जबाबदारी स्वीकारली. या काळात कामगारांच्या कामाचा दिवस १२ तासांवरून आठ तास करण्याच्या ऐतिहासिक निर्णयात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. कामगारांचे आरोग्य, कुटुंबासाठी मिळणारा वेळ आणि मानवी प्रतिष्ठा यांना या निर्णयामुळे महत्त्व प्राप्त झाले.

कामगारांना संघटित होण्याचा अधिकार, योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणी सन्मानजनक वागणूक मिळावी, यासाठी त्यांनी सातत्याने भूमिका मांडली. कामगार हा केवळ उत्पादनाचे साधन नसून आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. बोनस अधिनियम विशिष्ट पात्रता आणि अटी पूर्ण करणाऱ्या आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना बोनस देण्याची कायदेशीर चौकट निश्चित करतो. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याला कोणत्याही अटींशिवाय बोनस मिळतो, असे नाही. दिवाळीत बोनस मिळत असल्याने त्याला 'दिवाळी बोनस' म्हटले जाते; मात्र त्याचा संबंध कामगारांच्या आर्थिक हक्कांशी आहे.आजही असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगार, शेतमजूर, कंत्राटी कर्मचारी आणि रोजंदारीवरील श्रमिकांना स्थिर उत्पन्न, आरोग्य सुरक्षा आणि सन्मानजनक कामाच्या परिस्थितीसाठी संघर्ष करावा लागतो. कंत्राटी पद्धतीतील शोषण, असमान वेतन आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव यांसारख्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. दिवाळीचा बोनस घेताना कामगारांनी आपल्या हक्कांच्या संघर्षाचा इतिहास लक्षात ठेवावा, तर मालकांनी कामगारांच्या श्रमांचा सन्मान करावा. शासनाने कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. कारण उद्योग केवळ भांडवलावर नव्हे, तर कामगारांच्या घामावर आणि कौशल्यावरही उभा असतो. कामगारांच्या श्रमाला योग्य मोबदला, कुटुंबाला सुरक्षित भविष्य आणि समाजात सन्मान मिळणे, हीच बाबासाहेबांच्या श्रमिकविचारांना खरी मानवंदना ठरेल.



प्रवीण बागडे,
साहित्यिक
व सामाजिक
विश्लेषक, नागपूर

नरक बाहेर नाही, आपल्या सवयींतही असतो!

नरक चतुर्दशी म्हटली की पहाटेचे अभ्यंगस्नान, सुगंधी उटणे, नवीन कपडे आणि फटाक्यांचा आवाज आठवतो. नरकासुराचा वध करून श्रीकृष्णाने जनतेला भयमुक्त केले, अशी पौराणिक कथा सांगितली जाते. अंधारावर प्रकाशाचा, दुष्ट प्रवृत्तींवर सद्विचारांचा आणि अन्यायावर न्यायाचा विजय हा या दिवसाचा संदेश आहे. मात्र, या कथेकडे केवळ पौराणिक दृष्टिकोनातून न पाहता आपल्या आजच्या जीवनातील नरकासुर ओळखण्याची संधी म्हणूनही पाहायला हवे.

रस्त्यांवरील कचरा, नद्यांमधील सांडपाणी, हवेत मिसळणारा धूर, प्लास्टिकचा वाढता वापर, अन्नाची नासाडी आणि ध्वनीप्रदूषण या समस्या केवळ प्रशासनामुळे निर्माण झालेल्या नाहीत. आपल्या दैनंदिन वर्तनाचाही त्यात मोठा वाटा आहे. घरात स्वच्छता ठेवताना घराबाहेर कचरा टाकणे, स्वतःला शांतता हवी असताना मोठ्या आवाजात फटाके फोडणे आणि स्वतःच्या सोयीसाठी निसर्गाचे नुकसान करणे, ही विसंगती आपण थांबवली पाहिजे. नरक नेमका कुठे आहे? तो केवळ पौराणिक कथांमध्ये किंवा अंधाऱ्या जागेत नाही. आपल्या असंवेदनशील सवयींतही तो निर्माण होतो. आपल्या कृतींमुळे दुसऱ्यांचे जीवन अस्वस्थ होत असेल, निसर्गाचे नुकसान होत असेल आणि आपण त्याची जबाबदारी स्वीकारत नसू, तर आपल्या सभोवतालचे वातावरण आपणच जगण्यासाठी कठीण बनवत आहोत.

नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नान करून शरीराची स्वच्छता केली जाते. मात्र, शरीरासोबतच परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. स्वच्छ हवा, पाणी आणि परिसर हे आरोग्याचे अविभाज्य घटक आहेत. शहरांतील वाहनांचा धूर, औद्योगिक उत्सर्जन आणि कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन, तर ग्रामीण भागातील पाण्याचे प्रदूषण, प्लास्टिकचा वापर आणि जंगलांवरील वाढता ताण, या पर्यावरणीय समस्या गंभीर होत आहेत.

सणासुदीच्या काळात सजावटीचे साहित्य, प्लास्टिकची वेष्टने, एकदाच वापरली जाणारी भांडी आणि अन्नाची नासाडी यांमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढते. वस्तू वापरल्यानंतर त्यांचे काय होते, याचा विचारही आपण करायला हवा. फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायुप्रदूषण लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, प्राणी आणि पक्ष्यांसाठी त्रासदायक ठरते. उत्सवाचा आनंद दुसऱ्यांच्या वेदनेवर उभा राहू नये. या दिवसाची शिकवण आचरणात आणण्यासाठी ओला-सुका कचरा वेगळा ठेवणे, पाणी वाचवणे, अन्नाची नासाडी टाळणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि फटाक्यांचा वापर मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. सार्वजनिक जागा आपल्याच घराचा विस्तार समजून त्यांची स्वच्छता राखली पाहिजे.

नरकासुराचा वध करण्याची कथा आपण दरवर्षी ऐकतो; पण आपल्या सवयींमधील अपव्यय, निष्काळजीपणा आणि पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या वृत्तीवर विजय मिळवतो का, हा खरा प्रश्न आहे. प्रशासनाचे प्रयत्न आणि कायदे आवश्यक असले, तरी नागरिकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. या नरक चतुर्दशीला अभ्यंगस्नानाने शरीर स्वच्छ करूया आणि आपल्या सवयींचेही आत्मपरीक्षण करूया. घरातील अंधार दूर करण्याबरोबरच आपल्या वर्तनामुळे निर्माण होणारा सामाजिक आणि पर्यावरणीय अंधारही दूर करण्याचा संकल्प करूया. हाच नरक चतुर्दशीचा खरा संदेश!

- **विजयकुमार कट्टी,**
पर्यावरण अभ्यासक व लेखक

बलिप्रतिपदा

बलिप्रतिपदा हा काल गणनेचा वर्षारंभ दिन म्हणून साजरा केला जातो. शिवाय साडेतीन मुहूर्तांपैकी हा अर्धा मुहूर्त आहे. या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळी व त्याची पत्नी विंध्यावती यांची चित्रे काढून त्याची पूजा करतात. या दिवशी गोवर्धन पूजा करण्याची पण प्रथा आहे. त्याकरता शेणाचा पर्वत करून त्यावर फुले व दुर्वा खोचतात व या पर्वताच्या भोवती कृष्ण, इंद्र, गाई, वासरे यांची चित्रे मांडून त्या सर्वांची पूजा करतात. दीप व वस्त्रे यांचे दान करतात.

या दिवशी प्रातःकाळी अभ्यंग स्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. पंचपक्वांनांचा नैवेद्य करून नवीन वस्त्रे परिधान करून सर्व दिवस आनंदात घालवतात .बली हा वास्तविक असुर घराण्यातील असून सुद्धा त्याचा उद्धार त्याच्या उदार तत्वामुळे आणि त्याने भगवंताला अनन्य भावाने शरण जाऊन आपले सर्वस्व अर्पण केल्यामुळे भगवंताने त्याला योग्य मार्गदर्शन करून त्याच्या जीवनाला कलाटणी दिली आणि त्याचा उद्धार केला.

त्याच्या राज्यात असलेले असून वृत्तीला पोषक असे भोगमय विचार घालवून त्या ठिकाणी त्यागाची भावना रुजवून जनतेला दैवी विचार देऊन सुख आणि समृद्धी यांचे जीवन प्रदान केले. बळीराजा सत्वशील दानशूर होता.या गुणामुळे विष्णू ने त्याला पाताळ लोकाचे राज्य बहाल केले. आणि वरदान दिले की कार्तिक प्रतिपदेला लोक तुझ्या दानशूरतेची क्षमाशीलततेची पूजा करतील. तेव्हापासून बळीची पूजा करण्याची परंपरा सुरू झाली.

- **श्रीमती वासंती लावंघरे,** सातारा

'महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सुरेल जागर; 'माझी दिवाळी' गीत रसिकांच्या भेटीला!

पुणे(प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे, परंपरेचे आणि सण-उत्सवांचे दर्शन घडवणारा दिवाळीचा सण प्रत्येक घराघरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच दिवाळीच्या आनंदोत्सवाला सुरेल संगीताची जोड देत लेखक - दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांनी खास मराठमोळे दिवाळी गीत रसिकांच्या भेटीला आणले आहे. महाराष्ट्राच्या पारंपरिक दिवाळीचे मनोहारी दर्शन घडवणारे हे गीत सध्या रसिकांसाठी उपलब्ध झाले आहे.

'तोरण मांगल्याचे बांधू दारी,
चला रांगोळी काढू अंगणी।
आली दिवाळी... अंगणी माझ्या,
माझी दिवाळी...!'

अशा सुंदर आणि अर्थपूर्ण शब्दांनी सजलेल्या या गीतातून मराठी संस्कृतीचा गोडवा अनुभवायला मिळतो. घरासमोरील आकर्षक रांगोळ्या, दारावरील आंब्याच्या पानांची तोरणे, दिव्यांची रोषणाई आणि नात्यांमधील आपुलकी यांचे सुंदर चित्रण या गीतात करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दिवाळी पाडवा, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज अशा विविध सणांचे सांस्कृतिक महत्त्व या गीतातून उलगडण्यात आले आहे.



प्रवीण मेहंदी निर्मित आणि 'द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स' प्रस्तुत या गीताचे लेखन व दिग्दर्शन रामकुमार शेडगे यांनी केले आहे. संगीताची धुरा हर्षित अभिराज यांनी सांभाळली असून गायिका गायत्री शेलार आणि गायक हर्षित यांनी गीताला स्वर दिले आहेत. या गीतात प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, हेमल इंगळे यांच्यासह प्रज्वल ओसवाल, प्रमोद ओसवाल आदी कलाकारांचा सहभाग आहे. नृत्यदिग्दर्शन सुजितकुमार यांनी केले आहे. प्रोडक्शन हेड कृष्णा साबळे तर असिस्टंट डायरेक्टर विक्रांत कुलकर्णी हे आहेत. हे दिवाळी विशेष गीत 'द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स'च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित करण्यात आले आहे. https://youtu.be/9kZlZRYzbeI?si=zrm0jBHQInvZSDSQ गीताची लिंक असून मराठी संस्कृती, परंपरा आणि कौटुंबिक नात्यांचा गोडवा जपणाऱ्या या गीताला रसिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन लेखन-दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांनी केले आहे.

भाऊबीज अर्थात यमद्वितीया

भाऊबीज हा दिवस एकाच मातेच्या गर्भातून जन्म घेतलेल्या जीवांना एकमेकांशी वाटणारा जिव्हाळा म्हणजे प्रेम व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशीची बहीण आपल्या भावासाठी श्री यमाईदेवीकडे जे काही मागणी मागते त्याप्रमाणे तिच्या मनामध्ये असलेल्या भावानूसार भावाला त्याचे फळ मिळत असते. यामुळे तिचे भावाशी असलेले देवाणघेवाण हिशोब काही प्रमाणात कमी होण्यासाठी मदत होते. भाऊबीजेच्या दिवशी स्त्रीमध्ये असलेले देवीतत्त्व जागृत झाल्यामुळे भावाला त्याचा लाभ होतो. या दिवशी भाऊ त्याच्या बहिणीकडे जातो. बहिण भावाला ओवाळते. एखाद्या स्त्रीला जर भाऊ नसेल तर तिने कोणत्याही परपुरुषाला भाऊ मानून त्याला ओवाळावे. असे करणे शक्य नसेल तर चंद्राला आपला भाऊ मानून त्याला ओवाळावे. जर सख्खी बहीण नसेल तर नात्यातील एखाद्या स्त्रीला बहीण मानून तिच्याकडून ओवाळून घ्यावे. या दिवशी भावाबहिणीचे नाते जोपासण्यावर विशेष भर दिला आहे. पुरुषाच्या मनात स्त्री विषयी शुद्ध भाव निर्माण व्हावा हा यामागील हेतू आहे. भावाबहिणीचे एकमेकांवरील प्रेम हे पवित्र असते. या प्रेमाची देवाण-घेवाण होऊन एकमेकांविषयीचा कृतज्ञता भाव जागृत होण्यासाठी भाऊबीज साजरी केली जाते.

- संगिता भोसले, सातारा.

वृत्तपत्रांच्या छपाई आणि प्रकाशनाच्या अंतराबाबत केंद्र नियमावली जारी

नवी दिल्ली : भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या 'प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया' (PRGI) कार्यालयाने दैनिक वृत्तपत्रांच्या प्रकाशनाचे ठिकाण आणि छपाईचे ठिकाण यामधील अंतराबाबत एक महत्त्वाची मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. 'प्रेस सेवा पोर्टलवर' (Press Sewa Portal) नवीन वृत्तपत्र नोंदणी, नवीन आवृत्ती (New Edition) किंवा सुधारित नोंदणीसाठी अर्ज करताना काही प्रकरणांमध्ये छपाई केंद्र आणि प्रकाशनाचे ठिकाण यामध्ये अत्यंत लांब अंतर असल्याचे निदर्शनास आले आहे. हे अंतर व्यावहारिकदृष्ट्या अशक्य कोटीतील आणि अव्यवहार्य ठरत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व वृत्तपत्र प्रकाशक आणि संबंधितांना सल्ला देण्यात आला आहे की, त्यांनी अर्ज करताना प्रकाशनाचे ठिकाण आणि छपाई प्रेसचे ठिकाण हे तर्कसंगत (Logically feasible), व्यावसायिकदृष्ट्या शक्य (Commercially viable) आणि योग्य अंतरावर असल्याची खात्री करावी. या अंतराची व्यावहारिकता आणि कार्यक्षमता लक्षात घेऊनच त्याची सुसंगतता तपासली जाईल. प्रेस रजिस्ट्रार जनरल यांच्या मंजुरीने हे परिपत्रक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी करण्यात आले असून, सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिवाळी : परंपरेचा प्रकाश आणि विचारांचा उजेड

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा झगमगाट, फराळाची रेलचेल आणि खरेदीचा उत्साह नव्हे, तर भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, समृद्धी, सामाजिक एकोपा आणि माणुसकीचा जागर आहे. अंगणातील रांगोळी, आकाशकंदील, पणत्यांची रोषणाई आणि फराळाचा सुगंध वातावरण प्रसन्न करतो. मात्र, मातीची पणती स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देते, हाच दिवाळीचा खरा जीवनसंदेश आहे.

वसुबारसपासून भाऊबीजेपर्यंत साजऱ्या होणाऱ्या दिवाळीतील प्रत्येक परंपरेला विशेष अर्थ आहे. धनत्रयोदशी आरोग्याचे महत्त्व सांगते, लक्ष्मीपूजन श्रम आणि संपत्तीचा सन्मान शिकवते, तर गणेशपूजन विवेक आणि बुद्धीची प्रेरणा देते. नरकचतुर्दशी अन्यायाविरुद्ध लढण्याचा संदेश देते. बलिप्रतिपदा दानशूरता आणि लोककल्याणाची भावना जागवते, तर भाऊबीज भावंडांमधील प्रेमाचे नाते दृढ करते. या परंपरांचे पालन करण्याबरोबरच त्यातील जीवनमूल्ये आचरणात आणणे महत्त्वाचे आहे.

दिवाळीचा खरा गोडवा फराळाच्या पदार्थांत नसून तो वाटण्यात आहे. शेजाऱ्यांना फराळ देणे, जुने मतभेद विसरणे आणि नात्यांमधील दुरावा कमी करणे यातून सामाजिक एकोपा वाढतो. आपल्या घरात दिवे लावताना एखाद्या गरजू कुटुंबाच्या घरातही आनंदाचा



दिवा लावण्याचा विचार केला पाहिजे. दिवाळीच्या आनंदामागे कुंभार, फुलविक्रेते, छोटे व्यापारी, कारागीर आणि शेतकऱ्यांचे कष्ट असतात. त्यामुळे सणाची खरेदी करताना स्थानिक उत्पादकांना प्राधान्य देणे, हा त्यांच्या श्रमाचा सन्मान ठरेल. महागड्या भेटवस्तूंपेक्षा पुस्तके, दिवाळी अंक भेट देण्याची परंपरा रुजवली पाहिजे. उरलेला फराळ गरजूंना देऊन त्यांच्या आनंदात सहभागी होता येईल.आज वाढते ध्वनिप्रदूषण आणि वायुप्रदूषण लक्षात घेता फटाक्यांचा वापर मर्यादित ठेवून पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणे आवश्यक आहे. परंपरा जपत काळानुसार त्यात सकारात्मक बदल घडवणे हीच संस्कृतीची खरी ताकद आहे. दिवाळी दरवर्षी येते, घरे उजळतात आणि बाजारपेठा सजतात. मात्र, तिचा प्रकाश वर्षभर आपल्या विचारांत आणि कृतीत टिकला पाहिजे. गरजूंच्या मदतीला धावणे, द्वेष विसरून माणुसकी जपणे आणि समाजात प्रेमाचा प्रकाश पसरवणे, हाच दिवाळीचा खरा अर्थ आहे. हजारो पणत्या लावण्यापेक्षा एखाद्याच्या आयुष्यात आशेचा एक दिवा पेटवणे अधिक मोलाचे आहे. घराघरांत दिवे लावूया; त्याचबरोबर मनामनांत माणुसकीचा उजेडही जपूया!

- **राहुल हरीभाऊ इंगळे पाटील,** करकट्टा, ता. जि. लातूर

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी माऊली ऑफसेट प्रेस, गट क्रमांक ३२४/३, बैल बाजार रोड, मलकापूर - कराड, ता. कराड, जि. सातारा पिन कोड ४१५५३९ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Mauli Offset Press, Gat No.324/3, Bail Bajar Road, Malkapur-Karad, Tal- Karad, Dist- Satara Pin-415539, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

नवीन कवठेतील अनिल साळुंखे यांचा भाजपमध्ये प्रवेश

आमदार मनोज घोरपडे यांच्या नेतृत्वावर विश्वास

मसूर : नवीन कवठे (ता. कराड) येथील प्रगती विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन अनिल शंकर साळुंखे यांनी कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. साळुंखे हे यापूर्वी माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या गटाचे सक्रिय कार्यकर्ते होते. ते गेल्या दहा वर्षांपासून प्रगती विविध कार्यकारी सोसायटीच्या संचालक मंडळात कार्यरत असून, त्यांनी उपाध्यक्ष आणि चेअरमनपदाची जबाबदारीही सांभाळली आहे.



त्यांच्या भाजप प्रवेशामुळे नवीन कवठे परिसरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या वेळी विजय साळुंखे, प्रताप साळुंखे, विशाल यादव, गणेश घार्गे, विकास चव्हाण, विजय जाधव, राजेंद्र साळुंखे, विठ्ठल साळुंखे, कृष्णत साळुंखे, राजेंद्र जाधव, धनाजी साळुंखे यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

बाबासाहेबांची 'कॅम्प स्कूल सातारा' गेली कोठे?

७ नोव्हेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साताऱ्यातील शाळाप्रवेशाच्या स्मरणार्थ विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र, त्यांच्या शिक्षणप्रवासातील त्यापूर्वीचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या 'कॅम्प स्कूल सातारा' या मराठी शाळेचे नेमके ठिकाण कोणते, तिचे पुढे काय झाले आणि तिचे दफ्तर कुठे गेले, हे प्रश्न आजही अनुत्तरित आहेत.

आजच्या प्रतापसिंह हायस्कूलच्या जनरल रजिस्टरमध्ये अनुक्रमांक १९१४ वर 'भिवा रामजी आंबेडकर' अशी नोंद आहे. माझ्या पाहण्यात आलेल्या शाळा सोडल्याच्या दाखल्यात पूर्वीची शाळा म्हणून 'कॅम्प स्कूल, सातारा' असा उल्लेख आहे. जून १९०४ पासून ते इंग्रजी पाचवीत शिकत होते आणि नोव्हेंबर १९०४ मध्ये त्यांनी ही शाळा सोडली. मात्र, कॅम्प स्कूलमध्ये त्यांनी कोणत्या इयत्तांपर्यंत शिक्षण घेतले, प्रवेश कधी घेतला आणि शाळेची जागा कुठे होती, याबाबत स्पष्ट अभिलेख अद्याप उपलब्ध झालेले नाहीत.

या विषयाचा अभ्यास करताना चां. भ. खैरमोडे यांच्या बाबासाहेबांच्या चरित्रातील कॅम्प स्कूलविषयक उल्लेख आणि १३ एप्रिल १९४७ च्या 'नवयुग'मधील लेखाचा संदर्भ तपासण्याची गरज आहे. तसेच आंबेडकर गुरुजी आणि पेंडसे गुरुजी यांची ओळख, नियुक्ती, सेवाकाळ व बाबासाहेबांच्या शिक्षणातील योगदान यांचीही समकालीन कागदपत्रांच्या आधारे पडताळणी व्हायला हवी. साताऱ्यातील सदर बझार परिसर, सेंट थॉमस चर्चचा परिसर आणि अन्य ठिकाणी शोध घेतला; मात्र शाळेची अचूक जागा निश्चित करणारा पुरावा मिळालेला नाही. आजच्या तक्षशीला नगरपालिका शाळेच्या जुन्या दफ्तरात 'सातारा सबर्बन स्कूल' अशी नोंद असल्याची माहिती मिळाली आहे. ही शाळा आणि बाबासाहेबांच्या दाखल्यावरील कॅम्प स्कूल एकच संस्था होती का, याची कागदोपत्री पडताळणी आवश्यक आहे.



जुने शालेय अभिलेख, नगरपालिका ठराव, शिक्षण विभागाचे अहवाल, शिक्षकांच्या सेवानोंदी आणि मालमत्तेची कागदपत्रे तपासल्यास या शोधाला दिशा मिळू शकते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडेही यासंदर्भात अर्ज केला आहे. मात्र, हा शोध एका व्यक्तीपुरता मर्यादित न राहता अभ्यासक, संशोधन संस्था, विद्यापीठे आणि नगरपालिका यांनी सामूहिकपणे पुढे नेण्याची गरज आहे. 'कॅम्प स्कूल सातारा' ही शाळा गेली कोठे, हा केवळ एका इमारतीचा प्रश्न नाही; तो बाबासाहेबांच्या ज्ञानप्रवासातील दुर्लक्षित पान शोधण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थी दिन साजरा करताना त्यांच्या पूर्वीच्या शाळेचा इतिहासही पुराव्यांसह उजेडात आणूया.

प्रा.डॉ.सुभाष वाघमारे,
संशोधक व प्रकाशक,
साहित्यवेल प्रकाशन,
सातारा



वनकर्मचाऱ्यांनी जंगलात जाताना गमबुट वापरावेत : प्रा.डॉ.जयपाल पाटील



अलिबाग : जंगलात कामासाठी जाताना वनकर्मचाऱ्यांनी कायम गमबुटांचा वापर करावा. त्यामुळे सर्पदंश, विंचूदंश यांसारख्या संभाव्य धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण करता येईल. तसेच आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, असे मार्गदर्शन प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी केले.

अलिबाग येथे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षितता मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सर्पदंश, विंचूदंश, विजा कोसळणे, अचानक बेशुद्ध पडणे तसेच घरगुती अपघात अशा विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये घ्यावयाच्या काळजीची माहिती दिली. एखादा कर्मचारी अचानक बेशुद्ध पडल्यास तातडीने १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधावा. तसेच रुग्णाला सीपीआर (हृदय-फुप्फुस पुनरुज्जीवन) देण्याची पद्धत डॉ. पाटील यांनी प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. सर्पदंश किंवा विंचूदंश झाल्यासही त्वरित वैद्यकीय मदत घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

तालुका वन अधिकारी मिलिंद राऊत यांनी वनकर्मचारी नियमितपणे जंगलात येजा करीत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. प्रारंभी भाऊसाहेब यांनी डॉ. जयपाल पाटील यांचा परिचय करून दिला. त्यानंतर डॉ. पाटील यांनी उपस्थितांसमवेत संविधानाचे वाचन केले. सूत्रसंचालन भाऊसाहेब मुळेश तायडे यांनी केले, तर स्नेहा पाटील यांनी आभार मानले.

संभाजी ब्रिगेडची नांदेडमध्ये 'दुष्काळ चिंतन व संघर्ष परिषदे'चे आयोजन

नांदेड : संभाजी ब्रिगेडच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षाला समर्पित 'दुष्काळ चिंतन व संघर्ष परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात ही परिषद होणार आहे.

या परिषदेला संभाजी ब्रिगेडचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रवीण दादा गायकवाड, प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर, मुख्य प्रवक्ते प्रा. गंगाधर बनबरे आणि प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. यंदा मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांत दुष्काळाचे संकट गंभीर बनले आहे. पाणीटंचाई, शेतीचे नुकसान, शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी, शेतमजुरांच्या रोजगाराचा प्रश्न आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या अशा अनेक प्रश्नांनी सर्वसामान्यांचे जीवन प्रभावित झाले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षाच्या निमित्ताने सामाजिक परिवर्तन, समता आणि शोषित-वंचितांच्या हक्कांच्या विचारांना उजाळा देतानाच दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांसाठी संघटित संघर्षाची भूमिका या परिषदेत मांडली जाणार आहे. संभाजी ब्रिगेड नांदेड जिल्ह्याच्या वतीने आयोजित या परिषदेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

औंध मार्गे सातारा-विटा एसटी बससेवा सुरू



औंध : औंध-पुसेसावळी पंचक्रोशीतील नागरिकांच्या सोयीसाठी सातारा आगाराच्या वतीने सातारा-विटा-सातारा ही एसटी बससेवा औंध मार्गे सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे परिसरातील प्रवाशांना सातारा आणि विटा येथे जाण्या-येण्यासाठी सोयीचे होणार आहे.

सातारा येथून दररोज सायंकाळी ५ वाजता ही बस सुटणार असून रहिमतपूर, औंध, पुसेसावळी, चोराडे, खेरडे आणि नेवरी मार्गे रात्री ८.३० वाजता विटा येथे पोहोचणार आहे. विटा येथून सकाळी ६.३० वाजता साताऱ्याकडे परतीचा प्रवास सुरू होईल. नेवरी, येतगाव, खेरडे, पुसेसावळी, औंध आणि रहिमतपूर मार्गे ही बस सकाळी ८ ते ८.१५ वाजण्याच्या सुमारास औंध येथे पोहोचणार आहे.

या बससेवेमुळे औंधसह पंचक्रोशीतील विद्यार्थी, नोकरदार आणि सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विभाग नियंत्रक ज्योती गायकवाड, विभागीय वाहतूक अधिकारी सचिन शिंदे आणि विभागीय सांख्यिकी अधिकारी आदेश माने यांच्या विशेष प्रयत्नांतून ही बससेवा सुरू करण्यात आली. यासाठी सातारा आगार व्यवस्थापक रत्नकांत शिंदे आणि सहाय्यक वाहतूक अधीक्षक निलेश माने यांचे सहकार्य लाभले.

पत्रकार कल्याण निधीच्या मंडळातून

पत्रकार प्रतिनिधी वगळले

मुंबई : 'शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी'च्या कार्यकारी मंडळाला राज्य सरकारने एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. मात्र, मुदतवाढ देताना शासननियुक्त पत्रकार आणि पत्रकार संघटनांचे प्रतिनिधी असलेल्या १५ सदस्यांना मंडळातून वगळण्यात आले आहे. या निर्णयाचे राज्यातील पत्रकारांनी स्वागत केल्याचे चित्र आहे. गेल्या तीन वर्षांत पत्रकारांच्या प्रश्नांवर प्रभावी भूमिका न घेतल्याबद्दल संबंधित प्रतिनिधींविषयी पत्रकारांमध्ये नाराजी होती. पत्रकारांच्या कल्याणासाठी हा निधी १ ऑगस्ट २००९ रोजी स्थापन करण्यात आला. ट्रस्टमध्ये शासनाचे अधिकारी, शासननियुक्त पत्रकार आणि विविध पत्रकार संघटनांचे प्रतिनिधी असतात. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असून, विद्यमान मंडळाची मुदत १० जुलै २०२६ रोजी संपली होती. गेल्या तीन वर्षांत मदतीसाठी किती अर्ज आले, किती पत्रकारांना आर्थिक मदत मिळाली आणि मदत नाकारलेल्या अर्जांची कारणे काय, याचा तपशील संबंधित पत्रकार प्रतिनिधींनी जाहीर करावा, अशी मागणी पत्रकारांकडून होत आहे. नवीन कार्यकारी मंडळ नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू असून, नवीन मंडळ अस्तित्वात येईपर्यंत किंवा एक वर्षाची मुदत संपेपर्यंत-यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत-मुदतवाढ लागू राहील. या काळात शासनाचे प्रतिनिधी असलेले अधिकारीच ट्रस्टचे कामकाज पाहणार आहेत.

महादेव जानकर यांच्या हस्ते

àm.A‘ra BZm‘Xma

`m§Zm amï´>r` JéS>Pon nwañH$ma àXmZ



लोणंद : शैक्षणिक, सामाजिक आणि कौशल्य विकास क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. अमीर मुमताज सलीम इनामदार यांना ईगल फाउंडेशन, सांगली यांच्यावतीने राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. सिंहगड इन्स्टिट्यूट, कोर्टी-पंढरपूर येथे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा झाला. यावेळी सन्मानचिन्ह, मानपत्र आणि मानाचा फेटा देऊन प्रा. इनामदार यांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर आणि दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ईगल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विलासराव कोळेकर यांनी प्रा. इनामदार यांच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थी घडविण्यासोबतच शैक्षणिक, सामाजिक आणि कौशल्य क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची त्यांची धडपड उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. विवेकवादी विचारांची जपणूक करत निरपेक्ष भावनेने सदाचारी माणूस घडविण्यासाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महादेव जानकर म्हणाले, प्रा. अमीर इनामदार हे विद्यार्थी दशेपासून विवेकवादी चळवळीत कार्यरत आहेत. त्यांचे आजोळ माण तालुक्यातील म्हसवड येथे असून आपणही याच तालुक्यातील असल्याने आपल्या मातीतील व्यक्तीला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचा विशेष अभिमान वाटतो. प्रा. इनामदार यांच्या गेल्या पंधरा वर्षांतील शैक्षणिक व सामाजिक कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याने विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पोलिस प्रशिक्षणार्थींची ट्रॅव्हल्स पलटी; १५ जखमी

मसूर : धुळे येथील पोलिस प्रशिक्षणार्थींना घेऊन कोल्हापूरच्या दिशेने निघालेली खासगी ट्रॅव्हल्स कराड तालुक्यातील पाडळी-हेळगावच्या हद्दीत पलटी झाली. या अपघातात १२ पोलिस प्रशिक्षणार्थींसह चालक, सहचालक आणि क्लिनर असे एकूण १५ जण जखमी झाले. कराड-रहिमतपूर मार्गावरील खडकी शिवारात शरद जाधव यांच्या शेताजवळ ही घटना घडली. धुळे येथील २६ पोलिस प्रशिक्षणार्थींना घेऊन वैभव व राम टुर्स अँड ट्रॅव्हल्सची (एमएच ०९ जीई ९०४५) गाडी कोल्हापूरकडे रवाना झाली होती. गुरुवारी पहाटे अडीचच्या सुमारास पाडळी-हेळगावच्या हद्दीत चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल्स रस्त्यावर पलटी झाली.

या अपघातात सुजीत कदम, शिवम निकम, रुशिकेश पाटील, दशरथ यमकर, विनेश वायदंडे, पार्थ चौगुले, आकाश घाडगे, तुषार बर्गे, शुभम कुंभार, दिगंबर चरापले, सागर खामकर आणि शुभम कोळी हे १२ पोलिस प्रशिक्षणार्थी जखमी झाले. या अपघातप्रकरणी धुळे येथे पोलिस शिपाई म्हणून कार्यरत असलेले अभिषेक शहाजी पाटील (वय २८, मूळ रा. पाडळी खुर्द, ता. करवीर) यांनी मसूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. चालक समाधान लक्ष्मण पाटील (रा. नंदाळे बुद्रुक, ता. जि. धुळे) याने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने अपघात झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



घटनेची माहिती मिळताच मसूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आदिनाथ खरात आणि पोलिस उपनिरीक्षक एस. एस. भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास व्ही. बी. पोतेकर करीत आहेत.

मसूरमध्ये जलजीवन योजनेला ग्रामसभेचा हिरवा कंदील

मसूर/प्रतिनिधी : दुष्काळी परिस्थितीमुळे मसूरमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई आणि जलजीवन योजनेच्या अपूर्ण कामांवरून ग्रामस्थांमध्ये नाराजी असतानाच अखेर विशेष ग्रामसभेत नळजोडणीचे दर निश्चित करण्यात आले. घरगुती नळजोडणीसाठी दोन हजार रुपये अनामत रक्कम आणि १२०० रुपये पाणीपट्टी, तर व्यावसायिक नळजोडणीसाठी पाच हजार रुपये अनामत आणि १२०० रुपये पाणीपट्टी आकारण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. यामुळे जलजीवन योजनेच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्रशासक संतोष कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्रामसभेला जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब जगदाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य मानसिंगराव जगदाळे, ज्येष्ठ नेते नंदकुमार जगदाळे, जिल्हा बँकेचे माजी संचालक लहूराज जाधव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता एस. जी. पाटील, अभियंता गणेश घोरपडे आणि ग्रामविकास अधिकारी बालाजी मेढेवाड उपस्थित होते.

यापूर्वी संजयनगर परिसरातील काही ग्रामस्थांनी पाच हजार २०० रुपये भरून नळजोडण्या घेतल्या आहेत. मात्र, ही योजना संपूर्ण गावासाठी असताना एवढी रक्कम इतर ग्रामस्थांवर का लादली जात आहे, असा सवाल लहूराज जाधव यांनी उपस्थित केला. त्यानंतर घरगुती नळजोडणीसाठी दोन हजार रुपये अनामत आणि १२०० रुपये पाणीपट्टी निश्चित करण्यावर एकमत झाले. पूर्वी अनामत रक्कम भरलेली असून ग्रामपंचायतीकडे नोंद असलेल्यांना पुन्हा अनामत भरण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

योजनेतील वितरण व्यवस्था अपूर्ण असल्याच्या, अनेक ठिकाणी जलवाहिन्या पोहोचल्या नसल्याच्या तसेच रस्त्यांच्या कामामुळे पाइप खराब झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या. अक्षय कोरे आणि सागर जगदाळे यांनी ९५ टक्के काम पूर्ण झाल्याच्या दाव्यावर आक्षेप घेतला. सध्या मसूरच्या अनेक भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून काही ठिकाणी तीव्र पाणीटंचाई आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी अनामत रक्कम भरून नळजोडण्या अद्ययावत करून घ्याव्यात, असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले.

ग्रामविकास अधिकारी मेढेवाड यांनी नवीन बांधकामे आणि घरांच्या नोंदी ग्रामपंचायतीकडे करून घेण्याचे आवाहन केले. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन घरपट्टी आकारणी पुढील वर्षी करण्याबाबतही चर्चा झाली. या ग्रामसभेत घरगुती स्मार्ट मीटरला विरोध, भीमाशंकर येथील वृक्षतोडीचा निषेध, ऊसदर जाहीर करण्यासाठी साखर कारखान्यांना पत्र पाठविणे, ब्रह्मपुरीतील पथदिवे सुरू करणे, वस्तादांच्या मानधनाबाबत ठराव, शेतीपंपांना रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा आणि दिव्यांगांना करसवलत आदी विषयांवरही चर्चा झाली. ड. रणजीतसिंह जगदाळे, संभाजी बर्गे, प्रशांत पाटील, नरेश माने, ओंकार जगदाळे, अक्षय कोरे, बंडा चव्हाण, प्रकाश माळी आदींनी विविध प्रश्न मांडले.

एनसीसीला शालेय स्तरावर अधिक प्रोत्साहन देण्याची गरज : डॉ.सुरेश भोसले

कृष्णा विश्व विद्यापीठाचा एनसीसी वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

कराड : राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, सामाजिक जाणीव आणि शिस्त विकसित होते. त्यामुळे एनसीसीला शालेय स्तरावर अधिक प्रोत्साहन देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी केले. एनसीसी विद्यार्थ्यांच्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

कृष्णा विश्व विद्यापीठातील एनसीसी विभागाचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. प्रमुख पाहुणे डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर कृष्णा महिला औद्योगिक सहकारी संस्थेच्या संस्थापिका सौ. उत्तरा भोसले, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे, १९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अजयकुमार सिंग, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर कर्नल विक्रम राजेभोसले, उपकुलसचिव एस. ए. माशाळकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. भोसले म्हणाले, की एनसीसीचा गणवेश हा अभिमान व कर्तव्यभावनेचे प्रतीक आहे. आजच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळविणे आणि करिअर घडविणे यावर अधिक भर दिला जातो. मात्र संघटीतपणे काम करणे, सामाजिक जबाबदारी, शिस्त यांसारख्या मूल्यांकडे म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे कुशल व्यावसायिक तयार झाले तरी सामाजिक जाणीव असलेला नागरिक घडविण्याची प्रक्रिया अपुरी राहते. अशावेळी एनसीसी विभागाच्या एनसीसीच्या माध्यमातून जबाबदार नागरिक घडविण्याचे विशेष प्रयत्न होताना दिसून येतात.



भारतात शालेय शिक्षणापासून विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाची संधी अधिक व्यापक प्रमाणात उपलब्ध करून दिल्यास त्याचा फायदा समाज घडविण्याचे विशेष प्रयत्न होताना महत्त्व देऊन, ते अनिवार्य करण्याच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

आणि देशाला होईल, असे डॉ. भोसले यांनी नमूद केले. कर्नल अजयकुमार सिंग यांनी आपल्या मनोगतात कृष्णा विश्व विद्यापीठातील सुविधांचे कौतुक केले. एनसीसी ही जीवन जगण्याची पद्धत आहे. एकता आणि शिस्त हे एनसीसीचे ब्रीदवाक्य भावी भारताचे नेतृत्व घडविण्याचा मजबूत पाया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एनसीसीची मूल्ये जपून, देशासाठी शिस्तबद्ध आणि जबाबदार नेतृत्व निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी एनसीसीच्या विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कॅडेट्सचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी साकारलेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृतींना मान्यवरांनी भेट दिली. कृष्णा विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. ए. माशाळकर यांनी स्वागत व प्रास्तविक केले. उम्मेझारा शेख व अक्सा बीजू यांनी सूत्रसंचालन केले. ऐश्वर्या जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाच्या एनसीसी विभाग समन्वयक अर्चना कौलगेकर, डॉ. डी. के. अगरवाल, कृष्णा दंतविज्ञानचे अधिष्ठाता डॉ. शशिकिरण एन. डी., फिजिओथेरपीचे अधिष्ठाता डॉ. जी. वरदराजुलु, डॉ. एस. आर. पाटील, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रधान सल्लागार प्रा.डॉ. विनोद बाबर यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाचे सावट, तरी पाटणच्या बाजारपेठेत दिवाळीची लगबग

पाटण : दिवाळीचा सण जवळ आल्याने पाटण शहरातील बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. तालुक्यावर दुष्काळाचे सावट असल्याने बाजारपेठेतील खरेदीवर काहीसा परिणाम जाणवत असला, तरी आर्थिक परिस्थितीचा विचार करून नागरिक आपापल्या बजेटनुसार दिवाळीची तयारी करत आहेत.

पाटणची मुख्य बाजारपेठ, झेंडा चौक, नवीन व जुने बसस्थानक परिसर विविध वस्तूंच्या स्टॉल्सनी सजला आहे. रंगीबेरंगी आकाशकंदील, पणत्या, फटाके आणि पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. कपड्यांची तसेच सोने-चांदीच्या दुकानांमध्येही ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. दिवाळीनिमित्त दुकानदारांनी जाहीर केलेल्या सवलती आणि विविध योजनांमुळे इलेक्ट्रॉनिक वस्तू व मोबाईल खरेदीकडेही ग्राहकांचा कल वाढला आहे. घरगुती वापराच्या वस्तू, फळे आणि अन्य साहित्याच्या खरेदीसाठी सकाळपासूनच बाजारपेठेत गर्दी दिसून येत आहे.



यंदा पावसाने ओढ दिल्याने पाटण तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. त्याचा परिणाम नागरिकांच्या क्रयशक्तीवर आणि बाजारपेठेतील उलाढालीवर होत आहे. तरीही सणाचा आनंद कायम ठेवत नागरिक गरजेनुसार खरेदीला प्राधान्य देत आहेत. मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याऐवजी आर्थिक आवाक्याचा विचार करून प्रत्येक कुटुंब दिवाळी साजरी करण्याच्या तयारीत आहे. प्रतिकूल परिस्थितीतही परंपरा जपण्याची नागरिकांची धडपड बाजारपेठेतील वाढत्या वर्दळीतून दिसून येत आहे.

गडकिल्ले बांधणी स्पर्धेत प्रथम क्रमांकास ११ हजारांचे बक्षीस

जय हनुमान करिअर अकॅडमीचा उपक्रम

मसूर : दिवाळीच्या सुट्टीत बालगोपाळांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गडकिल्ल्यांचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने जय हनुमान करिअर अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, बेलवाडी यांच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी भव्य गडकिल्ले बांधणी स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत मसूर जिल्हा परिषद गटातील स्पर्धकांना सहभाग घेता येणार आहे. स्पर्धकांनी बांधलेल्या गडकिल्ल्याचे चार छायाचित्रे आणि स्वतःचे एक स्पष्ट छायाचित्र दिलेल्या व्हॉट्सप क्रमांकावर पाठवायचे आहे. छायाचित्रे पाठविण्याची अंतिम मुदत ८ नोव्हेंबर २०२६ आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी ११ हजार १११



रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार ७७७ रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५ हजार ५५५ रुपये, चतुर्थ क्रमांकासाठी ३ हजार ३३३ रुपये आणि पाचव्या क्रमांकासाठी २ हजार २२२ रुपये देण्यात येणार आहेत. याशिवाय सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र आणि उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता बेलवाडी येथील जय हनुमान करिअर अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये होणार आहे. भारतीय जनता पार्टीचे सातारा जिल्हा उपाध्यक्ष तथा अकॅडमीचे संस्थापक प्रमोद गायकवाड यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दिवाळीच्या सुट्टीत मुलांनी मोबाईलपासून दूर राहून प्रत्यक्ष कृतीतून ऐतिहासिक वारशाची ओळख करून घ्यावी, गडकोटांचा इतिहास जाणून घ्यावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार बालमनात रुजावेत, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी ७३५००१६६७४ किंवा ७३५००१६६७५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

प्रामाणिक रिक्षाचालकाने परत केला महागडा मोबाईल

भूपेंद्र ओसवाल यांच्या प्रामाणिकपणाचे कराडकरांकडून कौतुक

कराड : प्रवाशाचा रिक्षात विसरलेला महागडा मोबाईल शोधून तो मूळ मालकाकडे सुरक्षितपणे परत करत कराडमधील रिक्षाचालक भूपेंद्र ओसवाल यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या कृतीचे कराड शहर पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्यासह नागरिकांनी कौतुक केले.

भूपेंद्र ओसवाल हे अनेक वर्षांपासून कराड शहरात रिक्षा व्यवसाय करतात. रिक्षा चालवताना शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याबरोबरच त्यांनी आपल्या वेशभूषेतही शिस्त जपली आहे. अंगावर खाकी गणवेश, खिशावर बिल्ला, स्वतःच्या नावाची नामपट्टी आणि डोक्यावर गांधी टोपी असा त्यांचा नियमित पोशाख असतो.

५ नोव्हेंबर रोजी साऊद्दीन चौधरी या महिला प्रवाशाने कराड भाजी मंडई ते लाहोटीनगर, मलकापूर असा रिक्षाने प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्यांचा महागडा मोबाईल रिक्षातच विसरला. घरी गेल्यानंतर भूपेंद्र ओसवाल यांच्या ही बाब लक्षात आली. त्यांनी संबंधित महिला प्रवाशाचा शोध घेऊन मोबाईल परत करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर कराड शहर पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या उपस्थितीत त्यांनी हा मोबाईल मूळ मालकाकडे सुपूर्द केला. प्रवाशाच्या विसरलेल्या वस्तूवर स्वतःचा हक्क न सांगता ती प्रामाणिकपणे परत करण्याच्या त्यांच्या कृतीतून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. त्यांच्या या प्रामाणिकपणाचे पोलीस निरीक्षक दराडे आणि कराडकर नागरिकांकडून कौतुक होत आहे.



नवीन पुस्तके आणि दिवाळी अंकांचे भव्य प्रदर्शन

(सुरेश संकपाळ)

पाटण : वाचन संस्कृती जपण्याबरोबरच नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचकांना विविध विषयांवरील दर्जेदार साहित्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, पाटण यांच्या वतीने नवीन खरेदी केलेल्या पुस्तकांचे आणि दिवाळी अंक २०२६ चे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

मंगळवार, दि. १० रोजी सकाळी १० वाजता वाचनालयाच्या सभागृहात या प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी पी. डी. देसाई यांच्या शुभहस्ते नवीन पुस्तकांचे व दिवाळी अंकांचे प्रदर्शन खुले होणार असून, अमरसिंह पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या प्रदर्शनामध्ये विविध विषयांवरील नवीन पुस्तके, साहित्य, कथा, कादंबऱ्या, चरित्रग्रंथ, वैचारिक साहित्य तसेच विविध दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध असणार आहेत. पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञान, विचार आणि अनुभवांची समृद्ध शिदोरी वाचकांना मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थी, तरुण, साहित्यप्रेमी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे.

मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाच्या काळात पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. वाचनाची आवड असणाऱ्या नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी आणि साहित्यप्रेमींनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन पुस्तकांच्या ज्ञानसमृद्ध विश्वाचा आनंद घ्यावा, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष दत्तात्रय देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र पवार, सचिव प्रदीप साळवेकर व सर्व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते 'धगधगती मुंबई'च्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन

मुंबई : महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या शुभहस्ते 'धगधगती मुंबई'च्या विशेष दिवाळी अंक २०२६ चे प्रकाशन लोकभवन येथे उत्साहात संपन्न झाले.

यावेळी संपादक भीमराव बाळकाबाई हिंदुराव धुळप आणि ओमकार धुळप उपस्थित होते.राज्यपालांच्या शुभहस्ते झालेला हा प्रकाशन सोहळा 'धगधगती मुंबई'च्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद टप्पा ठरला. अनेक दिवसांच्या नियोजनातून, अथक परिश्रमातून आणि मेहनतीतून साकारलेल्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाल्याने संपादकीय टीमचा आनंद द्विगुणित झाला. या विशेषांकात नामवंत लेखक, पत्रकार आणि कवी यांचे वैविध्यपूर्ण लेख, कथा, साहित्य, राशिभविष्य, पाककृती, व्यंगचित्रे आणि मनोरंजनपर साहित्याचा समावेश करण्यात आला आहे.वाचकांच्या पसंतीस उतरलेला हा दिवाळी विशेषांक दादर येथील आयडियल बुक डेपो, मॅजेस्टिक बुक डेपो, ठाणे येथील मॅजेस्टिक बुक डेपो तसेच राज्यातील विविध एसटी डेपोमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती संपादक भीमराव धुळप यांनी दिली.



वसुबारसेने कराडमध्ये दीपोत्सवाचा मंगलारंभ; अकरा गायी-वासरांचे पूजन

कराड/प्रतिनिधी : दीपावलीच्या मंगलपर्वाला गुरुवारी (दि. ५) वसुबारसेने उत्साहात प्रारंभ झाला. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचे स्थान असून, तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. कराडमध्येही वसुबारसेनिमित्त महिलांनी गायी-वासरांचे पूजन करून दीपावलीच्या आनंदोत्सवाची सुरुवात केली.

नगरसेवक अजय पावसकर व मित्रपरिवाराच्या वतीने वसुबारसेच्या पूजनासाठी अकरा गायी-वासरांची व्यवस्था करण्यात आली होती. सोमवार पेठ व परिसरातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने गायी-वासरांना सजवून त्यांचे औक्षण केले. हळद-कुंकू, अक्षता, फुले अर्पण करून नैवेद्य दाखविण्यात आला. गायीची पूजा करून महिलांनी कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.वसुबारस हा दीपावलीतील पहिला सण मानला जातो. आश्विन वद्य द्वादशीला साजऱ्या होणाऱ्या या सणाला गोवत्स द्वादशी असेही संबोधले जाते. शेतीप्रधान भारतीय संस्कृतीत गाय आणि वासराचे महत्त्व अधोरेखित करणारा हा सण आहे. गायीच्या माध्यमातून मिळणारे दूध, शेतीला मिळणारे बळ आणि मानवी जीवनातील तिचे योगदान याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. या दिवशी गायी-वासरांचे पूजन करून त्यांना गोडधोडाचा नैवेद्य दिला जातो. महिलांसाठी या सणाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे.

दरम्यान, वसुबारसेच्या आगमनाने कराड शहरात दीपावलीच्या उत्साहाला उधाण आले आहे. सणाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांची गर्दी वाढली असून, दिवाळीच्या पुढील सणांची तयारीही सुरू झाली आहे. घराघरांत आनंद, उत्साह आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.



सुरज गुरव यांच्याकडे साताऱ्याच्या अप्पर पोलिस अधीक्षकपदाची सूत्रे

कराडमधील धडाकेबाज कार्यकाळाची पुन्हा चर्चा; डॉ.वैशाली कडुकर यांची पुणे येथे बदली

कराड/प्रतिनिधी : सातारा जिल्ह्याच्या पोलिस दलाला आता अनुभवी आणि कणखर नेतृत्व लाभणार आहे. कराडचे माजी पोलिस उपअधीक्षक सुरज गुरव यांची साताऱ्याच्या अप्पर पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कराडमध्ये त्यांनी बजावलेल्या धडाकेबाज कामगिरीच्या आठवणी पुन्हा चर्चेत आल्या आहेत. दरम्यान, सध्या या पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या डॉ. वैशाली कडुकर यांची पुणे येथे बदली झाली आहे.

सुरज गुरव यांनी २०१९ मध्ये कराडच्या पोलिस उपअधीक्षकपदाची सूत्रे स्वीकारली होती. आपल्या कार्यकाळात त्यांनी अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली. त्यांच्या आक्रमक कार्यपद्धतीमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींवर वचक निर्माण झाला होता. मात्र, वर्षभराच्या आतच त्यांची नागपूर येथे बदली झाली. या बदलीच्या निषेधार्थ कराडमधील नागरिक रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीचा आणि लोकप्रियतेचा प्रत्यय त्यावेळी आला होता. कोल्हापूर येथे कार्यरत असतानाही त्यांनी आपल्या कणखर भूमिकेची छाप पाडली होती. महानगरपालिकेशी संबंधित एका प्रकरणात त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. राजकीय दबावाला बळी न पडता नियमांनुसार काम करणारे अधिकारी, अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली.



याशिवाय, त्यांनी पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागातही काम केले आहे. नांदेड येथे अतिरिक्त पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना पोलिस प्रशासनातील जबाबदाऱ्या पार पाडतानाच सामाजिक आणि ऐतिहासिक उपक्रमांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांच्या पुढाकाराने फेब्रुवारी २०२५ मध्ये नांदेडमधील ३७ किल्ल्यांचा चार दिवसांचा ऐतिहासिक गडकिल्ले अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. आता सातारा जिल्ह्याच्या अप्पर पोलिस अधीक्षकपदाची जबाबदारी त्यांच्याकडे येत असल्याने जिल्ह्यातील पोलिस प्रशासनाच्या कामकाजात त्यांच्या अनुभवाचा उपयोग होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः कराडमधील त्यांच्या पूर्वीच्या कार्यकाळामुळे त्यांच्या नव्या नियुक्तीकडे स्थानिक पातळीवरही लक्ष लागले आहे.